# SCHOLARS IMPACT

Quarterly

An International Multidisciplinary Multilingual Peer Reviewed Research Journal

ISSN 2394 - 7632
EISSN 2394 - 7640

Special Issue

Approved By UGC Journal No- 41129

IMPACT FACTOR - 5.98


UGC (CPE) Sponsored
One Day Interdisciplinary National Level Conference
on

## "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM : CHALLENGES AND OPPORTUNITIES"

16th February 2019


**Volume-II, February 2019 (Special Issue)**



✤ EDITOR IN CHIEF ✤

DR. M. RAGHIB DESHMUKH

✤ GUEST EDITOR ✤

DR. BALASAHEB JADHAV



www.scholarsimpact.com


: Organised by :

**Department of Political Science**

M.S.P. Mandal's

**SHRI SHIVAJI COLLEGE, PARBHANI.**

UGC - College with Potential for Excellence NAAC Accrediated A+Grade (Third Cycle)

(Affiliated to : Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

| | | |
|---|---|---|
| 21. | भारतीय लोकशाहीमध्ये नीती आयोगाची भूमिका<br>प्रा. डॉ. गुढे दुर्गादेवी तुकाराम | 75 – 77 |
| 22. | भारतीय लोकशाही आणि प्रांतवाद<br>धन आनंद लक्ष्मीकांत | 78 – 81 |
| 23. | भारतीय लोकशाही आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>प्रा. डॉ. डि. आर. भागवत, प्रा. डॉ. शकुंतला देवराव जवंजाळ | 82 – 85 |
| 24. | भ्रष्टाचार ही लोकशाही पुढील आव्हान । एक अध्ययन<br>प्रा. डॉ. डी. के. कदम | 86 – 88 |
| 25. | अन्यथा भारताची लोकशाही संकटात सापडेल<br>प्रा. डॉ. जे. टी. कांबळे | 89 – 91 |
| 26. | भारतीय लोकशाही आणि सुशासन<br>प्रा. धर्मराज केशवराव कटके | 92 – 94 |
| 27. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे मतदानाच्या हक्काबाबत विचार<br>प्रा. प्रल्हाद दत्तराव भोपे | 95 – 98 |
| 28. | लोकशाहीवर दहशतवादाचा होणारा परिणाम<br>प्रा. शेंडगे वैभव | 99 – 101 |
| 29. | भारतीय लोकशाहीचे वास्तव व स्वरूप<br>प्रा. डॉ. गणेश गोविंदराव माने | 102-104 |
| 30. | दहशतवाद भारतीय लोकशाही समोरील एक आव्हान<br>प्रा. के. एम. नागरगोजे | 105-106 |

(24)

# भ्रष्टाचार ही लोकशाही पुढील आव्हान ! एक अध्ययन

प्रा. डॉ. डी.के.कदम
समाजशास्त्र विभाग प्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड

भारताला स्वातंत्र्य प्राप्त होऊन 70 वर्श पूर्ण झाली भारत देश जगात महासत्ताशाली बननण्याचे स्वप्न उराशी बाणमून विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे, परंतु विकासाची प्रकिया चालू असतांनाच भारतीय समाजात अनेक समस्या आ' वासून उभ्या आहेत. भारतीय समाजाने लोकशाही पद्धतीचा स्वीकार करून लोकशाहीचे 'मुल्य' समाजात रूजविले, परंतु आज लोकशाहीच्या 'मुल्या' पासून समाज दूर जातांना दिसून येतो. त्यामुळे समाजात एक नव्हे अनेक समस्या निर्माण होत आहेत. आज भारतीय समाजात मोठया प्रमाणात बेरोजगारी त्यातून दारिद्रय, बालगुण्हेगारी, गुन्हेगारी, वेश्या व्यवसाय, वाढती लोकसंख्या, हुंडाबळी, मदयपान, अश्पृश्यता, भिक्षावृत्ती झोपडपटया, इत्यादी अनेक समस्या आहेत. त्याच बरोबर समाजात 'विकृती' निर्माण झाली. गरजेपेक्षा जास्त प्राप्त करण्याची हाव ही विकृती आहे. आपला स्वार्थ पूर्ण करण्यासाठी वाटेल ते करण्याची हाव आज उदयाला येऊ पाहणारा 'चंगळवाद' हा एक प्रकारची विकृती होय. चंगळवादाला' फार जास्त पैसा लागतो. तेव्हा हा पूर्ण करण्यासाठी अवैध मार्गाचा स्वीकार करणे चोरटा व्यापार, तस्करी, कर (Tax) न भरणे भ्रष्टाचार या अनेक समस्या निर्माण होतात.

भ्रष्टाचार ही आपल्या देशासमारील मोठीसमस्या आहे. अगदी कार्यालयातील सरकारी शिपायापासून ते मोठया–माठेया राजकिय नेत्यापर्यंत अनेक जन भ्रष्टाचारास खत पाणी घालत आहेत.कोणतेही छोठेमोठे काम करायचे झाले तर आपल्या समोरच्याला काहीतर 'चिरीमिरी' दयावे लागते अशी मानसिकता सर्वाची बनलेली दिसून येते त्यामुळे दिवसे दिवस भ्रष्टाचार वाढतांना दिसून येतो. भ्रष्टाचार ही एक सामाजिक समस्या आहे. समाजावरील कलंक असून एक समाजाला लागली किड आहे. ज्याप्रमाणे एखादया झाडाला वाळवी लागते तेव्हा त्याला काही करू शकत नाही वरून व्यवस्थित दिसणारे झाड आतून पोखरून निघते ते एक दिवस कोलमडून पडते मालक त्या कडे फक्त पाहतो काही उपाय करून शकत नाही त्याप्रमाणे आज भ्रष्टाचार ही एक अतिशय वाईट समस्या आहे. त्यामुळे सर्व शासन मान्य जनतेचा नियामवरील, मुल्यावरील विश्वास कमी कमी होतांना दिसून येतो. परिणामी लोकशाहीवरील विश्वास कमी होताना दिसून येतो एवढेच नव्हे तर राजकिय पुढारी विरोधी पक्ष म्हणून असतात तेव्हा ही लोकशाही आहे का टोकशाही असा शब्द प्रयोग करतात ती वर्तमानपत्रे प्रसार माध्यामातून पुन्हा वाचण्यास मिळते. एका आंतरराष्ट्रीय संस्थेच्या मते जगातील सुमारे पावणेदोनशे देशामध्ये भ्रष्टाचारात भारताचा कमांक 94 वा आहे. विसाव्या शतकाच्या अखेरीस आर्थिक महासत्ता बनण्याची स्वप्न पाहत असतांना भारताची ओळख भ्रष्टाचारी देशापैकी एक झाली आहे. राजकिय पुढारी यांनी मोठे मोठे भ्रष्टाचार केले आणि काही दिवस तुरूंगात जाऊन पुन्हा सत्ता संपादन. करून लोकशाहीत देशात भ्रष्टाचारी लोक सत्ता चालवतात म्हणून आज भ्रष्टाचार हा एक चिंतनाचा गंभीर स्वरूपाचा विषय बनला आहे. म्हणून प्रस्ततु शोध निबधात भ्रष्टाचार हा लोकशाही पुढील आव्हान ! एक अध्ययन यांचा अभ्यास केला आहे.

अध्ययनाचा उददेश (Study of Objective)

1) भ्रष्टाचार समस्येचा सखोल अभ्यास करणे
2) 'मुल्य' परिवर्तन आणि भ्रष्टाचार यांचा अभ्यासकरणे
3) भ्रष्टाचारची व्याप्ती दिवसे दिवस वाढते का ? यांचा अभ्यास करणे

## तथ्य संकलन (Data Collection)

प्रस्तुत शोध निबंधाच्या तथ्य संकलन करताना प्राथमिक व द्वितीय संकलन पध्दतीचा अवलंब केला प्राथमिक स्त्रोतात मुलाखत तंत्र यांचा वापर केला आहे. द्वितीय संकलन पध्दतीत संशोधन विषयाशी संबंधित पुस्तके, ग्रंथ व निमशासकीय, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे मासिके शोध प्रबंध तसेच इंटरनेट वरील माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

## तथ्य विश्लेषण (Data Analysis)

भ्रष्टाचार ही संज्ञा विचार करता ही संज्ञा मुल्याशी संबंधित आचारणाशी संबंधित आहे. भ्रष्ट + आचरण = भ्रष्टाचार आचारण व्यक्तिच्या नैतिक व्यवहार प्रकट करते, परंतु जे आचरण समाजातील नैतिकतेच्या विरोधी आहे. ज्या आचारणातील समाजातील कायदयाचे उल्लघन आहे. तो भ्रष्टाचार आहे. समाजशास्त्रीय दूष्टोकोनातून भ्रष्टाचाराचा अर्थ नैतिकतेच्या विरोधी वर्तन आहे. व्यक्तीगत स्वार्थसाठी विवेकबुध्दी सोडून वर्तन करणे लाच घेणे भारतीय दंडसहीतेतील कलम 161 प्रमाणे बेकायदेशीर वर्तन होय, भ्रष्टाचार करणारी व्यक्ती आपला हेतू पूर्व करण्यासाठी गैर मार्गाचा वापर कयन पैसा मिळविण्याचा प्रयत्न होय. आज प्रत्येकाला लवकर श्रीमंत व्हावे वाटते त्यामुळे लोकशाहीचा मूल्य कायदयाचे उल्लंघन करून भ्रष्टाचार करतांना दिसून येतात.भारतीय समाजात भ्रष्टाचार ही एक सार्वजीक स्वरूपाची समस्या आहे. आज भ्रष्टाचार हा व्यावसायिक राजकिय, शैक्षणिक धार्मिक आणि प्रशासकीय क्षेत्रात भ्रष्टाचार होतांना दिसून येतो.फोर्ब्स या संस्थेच्या सर्वेक्षणानुसार (मार्च 2017) भारत हा भ्रष्टाचार त प्रथम कमांकावर आहे. आज सार्वजनिक भ्रष्टाचार होत असतांना फक्त राजकिय क्षेत्रा तील भ्रष्टाचार जनते समोर येतो. जनसंपर्क माध्यमे हे पण जास्त प्रमाणात राजकिय भ्रष्टाचाराचा ऊहापोह करतांना दिसून येतात. राजकिय क्षेत्रातील नेत्याद्वारा युरिया घोटाळा बोफोर्स घोटाळा, साखर घोटाळा, चारा घोटाळा, शेअर्स घोटाळा, तर राफेल घोटाळा यावर उलट–सुलट चर्चा होतांना दिसून येते.

भ्रष्टाचार आज सर्व सामान्याशी संबधित विषय बनला आहे. कारण सर्व सामान्याची एक मानसिकता बनली आहे. की, कोणत्या ही क्षेत्रातील, प्रशासकीय कार्यालयातील काम काही तरी दिल्याशिवाय होऊ शकत नाही. प्रत्येक जन कार्यालयात कामासाठी जातांना काही लाच देऊन काम करावे लागते म्हणजे काही दिल्याशिवाय काम होऊ शकत नाही या तयारीने व्यक्ती कामासाठी घराबाहेर पडतांना दिसून येतो. शासकीय कार्यालयातील कर्मचारी ईमानदारी, कर्तव्यनिष्ट, मुल्या नुसार वर्तन करून आपणास काही प्राप्त होत नाही. शासकीय अधिकारी प्रशासनात भ्रष्टाचार करतात सरकारी मालमत्तेची चोरी करतात अनेक सरकारी वस्तु विकतात शासकिय यंत्रणा शासकीय वाहनाचा गैरवापर, शासकिय कार्यालयातील कागद शाई, टाचणी, फर्नीचर विकतात त्याच बरोबर शासकिय कार्यालयाला लागणा–या वस्तुमध्ये कमीशन काढणे हे सर्वत्र चालू आहे.

आज प्रत्यक्ष रेल्वे प्रवास करतांना निरीक्षणात असे दिसूण आले की, रेल्वे विभागातील तिकीट निरीक्षक रिजर्वेशन डब्यात अनेक प्रवासी जनरलचे तिकीट घेऊन बसतांत तेव्हा रेल्वे तिकीट निरीक्षण त्यांच्याकडून 20 रूपया पासून 500 रूपया पर्यंत विनापावती पैसा घेतांना दिसून येतात. विनातिकीट प्रवाशाना सोडून देताना दिसून येते. त्याच प्रमाणे शिक्षणक्षेत्रात शिक्षक, प्राध्यापकांना कडून देणगी घेऊन नियुक्ती करणे आज शिक्षण क्षेत्रात डोनेशनचा बाजार भरला आहे.

राजकिय क्षेत्रामध्ये मते विकत घेणे तो पैसा वसुल करण्यसाठी पुन्हा भ्रष्टाचार करणे मदयपार्टया देणे, नातेसंबंधातील लाकोना ट्रेन्डर देणे नौक–या देणे अशी राजकिय क्षेत्रातील भ्रष्टाचारीचे चक निर्माण झाले अगोदर निवडून येण्यासाठी पैसा देणे निवडून आल्यावर सत्तेचा गैर वापर करतात पैसा मिळणे त्यामुळे आज प्रत्येक नेत्याकडे वाममार्गाने बेहिशोबी मालमत्ता गोळा केल्याने दिसून येते. हे एक लोकशाही पुढील मोठे आव्हान आहे. राजकियक्षेत्रात सुशिक्षित तरूण मंडळी राजकरणापासून डूर जात आहे. राजकारणासाठी बुध्दी लागत नाही तर राजकारणसाठी पैसा लागतो अशी मानसिकता बनली आहे. मतदारांना प्रश्न विचारला की, आपण मतदानासाठी पैसे घेता का ? जवळपास 80 टक्के खेडयातील लोक पैसे घेऊन मतदान करतांना दिसून येतात हे वास्तव आहे. कारण ग्रामपंचायत पंचायात समिती, जिल्हापरिशद,विधान सभा, लोकसभा या निवडणूकीत पैसे घेतात पण ग्रामपंचयात मतदानाचा भाव जास्त असतो लोकसभेपर्यत कमी कमी होतांना दिसून येतो. ग्रामपंचायात पासून ते भारताच्या संसदेपर्यंत राजकारण भ्रष्टाचाराचे केंद्र बनली आहेत. आज ग्रामसेवक तलाठी यांच्या पासून सर्वच अधिकारी हे लाच घेतांना दिसून येतात इंदिरा आवास योजना व दारिद्रयरेशेखालील लोकांना योजना होती. तीला ग्रामीण भागात

सरकारेने ही योजना बंद करून पंतप्रधान आवास योजना सुरु परकूल योजना असे म्हटले जात होते परंतु मोदी केली ही योजना आज सर्वांना घरे देणे हे चालू आहे. प्रत्यक्ष काही लाभार्थींच्या मुलाखती घेतली पंतप्रधान आवास योजनेसाठी काही घ्यावे लागते का? पंतप्रधान आवास योजनेची यादी ही Online करावी लागते यासाठी काही ग्रामसेवक सरपंचानी 300 रूपये तर काही टिकाणी 500 रूपये सरपंच तर कुठे ग्रामसेवक घेतल्याचे दिसून आले यादित नांव वर आणतो यासाठी पण सर्वसामान्या कडून पैसे घेतल्याचे दिसून आले जात पडताणी कार्यालय समाजकल्याण अधिकारी कार्यालयात c.c.tv कॅमे–यात कामकाच चालू असे कार्यालयात गेट पासून ते कार्यालयातील भिंतीवर आपण c.c.tv कॅमे–याच्या नजरेत आहात असे लिहले असते परंतु प्रत्यक्ष दर्शनी जातपडताळणी कार्यालयात सर्रासपणे लाच देणे – घेणे चालू असते असे दिसून आले सेवकामार्फत किवा कर्लाक मार्फत लाच घेतात. कारण एकाच दिवशी कार्यालयात दाखल केलेल्या फाईल जो लाच देतो त्यांचे काम लवकर होते. परंतु जो लाच देत नाही त्यांची फाईल येथेच धूळ खात पडते जो लाच देत नाही त्यांचे अनेक दिवस काम बुडते प्रवास खर्च हेतो त्यामुळे एक दिवस संतापून जातो एखादया दलाला मार्फत लाच देण्यास तयार होतो ही वस्तुस्थिती आसल्याचे दिसून येते आज मुल्यात परिवर्तन झाले असून ईमानदारी, नैतिकता, सत्य, कार्तव्यनिष्टा ही मुल्य मागे पडून पैसा हेच मुल्य बनले आहे. नैतिक मुल्ये पायदळी तुडविली जातात कोणत्याही मार्गाने श्रीमंत व्हावे असे वाटते मुल्याकडे  खुले आम पणे दुर्लक्ष करून लोकशाहीत मुल्ये, त्याग, सेवावृत्ती, अनासक्ती, प्रमाणिकता, देशनिष्टा यापासून दूर जाऊन भ्रष्टाचार वाढतांना दिसतो. आज प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचार होतो. राजकिय नेत्यांना विकास निधी देतांना 10 टक्के पासून 20 टक्क्यापर्यंत म्हणजे अगोदर दहा लाख विकास निधीसाठी दोन लाख रूपये मोजावे लागत. सरपंच ग्रामसेवक, विस्तारअधिकारी, गटविकास अधिकारी, कार्याकारी आभियंता यांचे टक्केवारी गुत्तेदाराकडून घेतात त्यामुळे गुत्तेदार लोक निकृष्ट दर्जाचे कामे करून या सर्वाना लाच देतांना दिसून यते हे वास्तव आहे. आज राजकिय, शिक्षण न्यायव्यस्था पोलिस, सरकारी कार्यालये, सामाजिक धार्मिक आर्थिक क्षेत्रात भ्रष्टाचार कमी– अधिक प्रमाणात होत आहे विदारक आहे. भ्रष्टाचार पायबंद करण्यासाठी भ्रष्टाचार प्रतिबंध हे कायदे आहेत त्यांची कडक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. आज भारतीय समाजाला मुल्य शिक्षणाची आवश्यकता आहें. लोकशाहीला मजबूत ठेवण्यासाठी लोकशाही मुल्याचा सर्वत्र प्रचार प्रसार करणे आवश्यक आहे. आपल्या भारताची प्रगती व्हावी, भारत भ्रष्टाचार मुक्त करण्यासाठी सर्वानी प्रतिज्ञा करावी कि मला कितीही त्रास झाला, कामासाठी किती ही वेळ लागला तरी मी लाच देऊन काम करणार नाही शासकीय कर्मचारी वर्गानी कर्तव्य निष्टा, नैतिकतेची जोपसना करणे गरजेचे आहे.

## संदर्भ


1) राम आहूजा, सामाजिक समस्या डॉ. रावत पाब्लेकेश्न्स जयपूर एव नई दिल्ली
2) www. Corruptirn News India
3) Dr. D.S. Manuar. Indian societay Issuess Problems Aruna Publication Latuar
4) प्राथमीक स्त्रोत मुलाखत,